# श्रीगजानन महाराजांची महती

बा गजानना ।

तू सत्याचे दर्शन आहेस ।

तू मनाच्या आकारातील सात्विक बदल करणारा आहेस ।

तू स्फूर्तींचे जागृतस्थान आहेस ।

तू सिद्धांच्या मालिकेतील मेरूमणि आहेस ।

तू अखंड ब्रह्मचारी व सकळांची माता आहेस ।

तू सकल ग्रंथाचे सार आहेस ।

तू वाटिकेतील कल्पतरू आहेस ।

तू जीवनातील मधुर संगीत आहेस ।

तुझा कळस मांगल्याचे दर्शन ।

तू कैवल्याचा ठेवा आहेस ।

तू देवत्वाकडे नेणारा लोहचुंबक आहेस ।

तू समाधानाची प्राप्ती करून देणारा आहेस ।

तू जीवनातील निरामय आनंद आहेस ।

तू भक्तांचे निवासस्थान आहेस ।

तू कर्ताकरविता आणि अन्नदाता आहेस ।

तू रोग्यांना धन्वंतरी आहेस ।

तू विश्वाचा अभियंता आहेस ।

तुझा ध्वज धैर्याची प्रतीक ।

तुझा गादी सेवेची संधी ।